गुरुजी
शोध

# नवं पर्व!

**आपणच आपल्यावर घातलेल्या सीमेचे उल्लंघन संकल्पपूर्वक करणे आवश्यक ठरते. या सर्व सीमा उल्लंघून ज्ञान, भक्ती आणि सत्कर्माच्या सहायाने विकाररूपी असुरांचे निर्दालन करून अध्यात्मातला विशेष विजय संपादन करणे... हे पर्व आहे. नवं पर्व आहे.**

जयादशमीच्या शुभमुहूर्ताला आपल्या परंपरेने विशेष स्थान दिले आहे. शस्त्रास्त्रांचे पूजन करून नवीन भूमी जिंकण्यासाठी, अन्यायाचे परिमार्जन करण्यासाठी आणि आपले क्षात्रतेज प्रकट करण्यासाठी वीरांनी या मुहूर्तावर सीमोल्लंघन करावे असा प्रघात प्राचीन काळापासून हिंदू संस्कृतीमध्ये आहे. जिंकलेल्या नवीन भूमीवर सत्कर्म, सदाचार आणि सहृदयता यांचा विचार करून चांगल्या संस्कृतीची स्थापना सबंध मानवतेमध्ये करणे हा यामागचा मूळ हेतू होय. समाजातल्या आसुरी प्रवृत्तींवर शौर्याने विजय मिळवून हा विजय साजरा करणे हे विजयादशमीचे प्रमुख वैशिष्ट्य. महिषासुरमर्दिनी जगन्माता अंबेने घटस्थापनेपासून सुरुवात करून पुढचे नऊ दिवस महिषासुराशी अखंड युद्ध करून विजयादशमीच्या दहाव्या दिवशी त्याचे निर्दालन केले असा पौराणिक उल्लेख आढळतो. प्रभू रामचंद्रांनीसुद्धा विजयादशमीच्या दिवशीच रावणाचा नि:पात करून आसुरी साम्राज्यावर प्रचंड विजय मिळवला असे वाल्मीकी रामायण सांगते. इतिहासातल्या या सर्व नोंदींचा आणि परंपरेचा विचार करता असे लक्षात येते की, घटस्थापनेपासून नऊ दिवस, नऊ रात्रीचा हा काळ युद्धाचा, लढण्याचा काळ आहे ज्याचा शेवट दहाव्या दिवशी विजयाने करणे अपेक्षित असते.

जीवनात प्रत्येक क्षणी मनुष्याला युद्ध करावे लागते. अगदी अध्यात्मातसुद्धा युद्ध करून यश संपादन करावे लागते. 'रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग' असे तुकाराम महाराज म्हणतात ते याचकरिता. प्रत्यक्ष युद्धभूमीवर लागणाऱ्या वीरत्वाएवढेच, किंबहुना त्याहीपेक्षा जास्त वीरत्व आध्यात्मिक क्षेत्रात आवश्यक असते. भौतिक जगात आणि अध्यात्मात एक महत्त्वाचा फरक मात्र असतो; अध्यात्मातले शत्रू हे बाह्य जगापेक्षा मनुष्याच्या अंतरातच जास्त प्रमाणात असतात. देहामधे, मनामधे आणि चित्तामधे ते विकाररूपाने विराजमान असतात. सृष्टीचे आकलन होण्यासाठी मनुष्याला ईश्वराने पाच ज्ञानेंद्रिये आणि पाच कर्मेंद्रिये दिली आहेत. यांच्याद्वारे शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध या संवेदना मनुष्याला प्राप्त होतात आणि बाह्य सृष्टीचे ज्ञान होते. या ज्ञानाबरोबरच आपापल्या आवडी-निवडीप्रमाणे सुख-दु:खाची निर्मितीसुद्धा मानवी मनात होत असते. ही सुखे मिळण्यामध्ये बाधा निर्माण झाली की क्रोध, मोह, मत्सरादी षड्विकार मनुष्यामधे निर्माण होतात. या दहा इंद्रियांमधली आणि त्यांच्याकडून मिळणाऱ्या सुख, दु:खांमधली लिप्तता जोपर्यंत कमी होत नाही तोपर्यंत मनुष्याची एकाग्रता ईश्वरचरणी साधत नाही आणि अशा पार्श्वभूमीवर आध्यात्मिक प्रगती होणे अवघड असते. या दहा इंद्रियांवर संपूर्ण विजय मिळवण्याच्या कार्याचा प्रारंभ विजयादशमीच्या निमित्ताने करायचा असतो. अर्थात दहा इंद्रियसुखांमधील लिप्ततेचे हरण करणारा तो 'दशहरा'!

इंद्रियांवर विजय मिळवणे ही सुरुवात असते. याची पुढची पायरी म्हणजे सत्व-रज-तम या त्रिगुणांवर विजय मिळवणे. मनुष्याला ईश्वरचरणी विलीन होण्याकरिता त्रिगुणातीत व्हावे लागते, म्हणजेच या तिन्ही गुणांच्या अतिरिक्त अधिक्यावर विजय मिळवावा लागतो. आत्मशोधन केल्याशिवाय आपल्यामधे कोणता गुण सद्गुणाच्या अथवा दुर्गुणाच्या रूपाने विराजमान आहे हे मनुष्याला समजत नाही. यासाठी आत्मशोधन करून त्रिगुणांचा समतोल साधण्यासाठी प्रयत्न करणे अध्यात्माला अपेक्षित असते. याकरिताच नवरात्रीच्या काळात आपल्याकडे शक्तीची आराधना तीन स्वरूपात करण्याची परंपरा आहे. पहिल्या तीन दिवसांत तमोगुणप्रधान असणाऱ्या महाकालीचे पूजन, पुढचे तीन दिवस रजोगुणाचे प्रतीक असणाऱ्या महालक्ष्मीची उपासना आणि अंतिम तीन दिवसांमध्ये सत्वगुणरूपिणी महासरस्वतीची आराधना केली जाते. नऊ दिवसांच्या कालावधीत एक एक दिवसाच्या पायरीने मार्गक्रमणा करून तिन्ही गुणांवर विजय मिळवायचा असतो आणि शेवटी जो अहंकाररूपी रावण शिल्लक उरतो त्याचेही निर्दालन दहाव्या दिवशी होणे अपेक्षित असते. अहंकाराचे दहन करण्याचा कृतनिश्चय करणे हाच रावणाच्या प्रतीकाचे दहन करण्यामागचा प्रमुख हेतू आहे.

दशेंद्रियांवरचा विजय, त्रिगुणांवरचा विजय आणि सर्वात शेवटी अहंकारावरचा विजय. या प्रत्येक पायरीवर, मनुष्य निसर्गाने ठरवलेल्या देहाच्या आणि मनाच्या सीमांचे उल्लंघन करीत असतो. मायाबाजारात अडकल्यामुळे मनुष्याने सत्कर्माबाबतीत स्वत:च स्वत:वर लादून घेतलेल्या काही सीमा असतात. उदाहरणार्थ 'मी इतक्या मर्यादेतच तप करेन, सत्कर्म करेन, साधना करेन, यापेक्षा अधिक मला जमणार नाही; अध्यात्म, ईश्वरप्राप्ती, आत्मज्ञान वगैरे जे काही म्हणतात ते मला शक्य नाही', अशा अनेक प्रकारच्या सीमा आपण स्वत:वर लादून घेतो. वस्तुत: मानवी मनात अपरिमित शक्ती वसत असते. त्याचा योग्य उपयोग होण्यासाठी अवकाश असतो, तो फक्त संकल्पाचा! मर्यादित सत्कर्म हे मर्यादितच फळ देणार. अमर्याद अशा ईश्वरीतत्त्वापर्यंत पोहोचायचे असेल तर प्रथम आपणच आपल्यावर घातलेल्या सीमेचे उल्लंघन संकल्पपूर्वक करणे आवश्यक ठरते. या सर्व सीमा उल्लंघून ज्ञान, भक्ती आणि सत्कर्माच्या सहायाने विकाररूपी असुरांचे निर्दालन करून अध्यात्मातला विशेष विजय संपादन करणे हा विजयादशमीच्या शुभमुहूर्ताचा अत्युच्च संदेश आहे.

(वासुदेव वामन बापट गुरुजी ओम सद्गुरूप्रतिष्ठानच्या बोरिवली, बदलापूर आणि खोपोली स्थानांवर गुरुपदावर विराजमान आहेत.
संपर्क : bhende@indiatimes.com
- वासुदेव वामन बापट